ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯ ನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ

ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ ಬೆಂಗಳೂರು – 560003

# KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD

Malleshwaram, Bengaluru-560003

## S.S.L.C. MODEL QUESTION PAPER 2022-23

## Subject : SOCIAL SCIENCE

**Medium : MARATHI**

**Time : 3 hours 15 minutes** **Subject Code : 85M**

**Max. Marks : 80**

**CCE-RF**

**Revised Regular Fresh**

---

## विद्यार्थ्यांना सामान्य सूचना

1 या प्रश्नपत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ प्रकारचे 38 प्रश्न आहेत .

2 प्रश्नपत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील(बंद) करण्यात आली आहे . परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे प्रश्नपत्रिका मधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पहा.

3 बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.

4 उजव्या बाजूच्या काठावर असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5 प्रश्नांची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या वरील बाजूस दिला आहे त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे ही दिलेली आहेत.

**I खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार पर्याय दिलेले आहेत. बरोबर असलेला पर्याय निवडा आणि पूर्ण उत्तर त्याच्या संकेताक्षरासह लिहा** **8x1=8**

1. भारतातील भाषावार प्रांतरचनेतील पहिले उदयास आलेले राज्य हे आहे

A) मैसूर राज्य B ) आंध्र प्रदेश

C ) सौराष्ट्र D)उत्तर प्रदेश

2. पहिल्या महायुद्धाचे तात्कालीन कारण हे होते.

A) सलोखा आणि मैत्रीचा करार याची रचना

B ) अमेरिकेने तटस्थ धोरण अवलंबिले

C ) वर्सोलीस च्या तहाचा अपमान

D ) आर्चड्यूक फ्रान्सिस फर्डीनांड याची विश्वासघाताने झालेली हत्या .

3. आमच्या घटनेचे 21 वे कलम हे दर्शविते

A) धर्म स्वातंत्र्याचा हक्क

B ) शोषणाविरुद्धचा हक्क

C) घटनात्मक परिहाराचा हक्क

D) शिक्षणाचा मूलभूत हक्क

4. मजुरी रहित कामाचे उत्तम उदाहरण हे आहे

A ) वेठबिगार कामगार B) शेतीतील कामगार

C ) गृहिणी D ) माळी

5. पारंपारिक ऊर्जा साधनाचे उत्तम उदाहरण हे आहे.

A) पवन ऊर्जा B) नैसर्गिक वायू

C) सौर ऊर्जा D) जलविद्युत शक्ती

6. भारताचे चहाचे बंदर हे आहे.

A) न्यू मंगळूर B) हळदीया

C) पारदीप D) कोलकत्ता

7. जिल्हा औद्योगिक केंद्रे स्थापन झालेले वर्ष हे आहे.

A) 1968 B) 1978

C) 1988 D) 1998

8. भारतातील हरितक्रांतीचे पितामह हे आहेत.

A) डॉ.नॉर्मन बोरलॉग B) किरण मुजुमदार शहा

C) डॉ.एम एस स्वामीनाथन D) वर्गीस कुरेन

**II खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. 8x1=8**

9. सरदार वल्लभभाई पटेल यांना भारताचे पोलादी पुरुष असे का म्हणतात?

10. तीन मूर्ती भवन चे महत्व काय आहे?

11. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा समितीचे भारताला कायमचे सदस्यत्व मिळावे म्हणून कोणता देश पाठिंबा देत आहे ?

12. प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान चाचणी प्रतिबंध कायदा का लागू करण्यात आला?

13. हुंडा पद्धत म्हणजे काय ?

14. किनारपट्टीवर आम्ही मॅंग्रोव्ह अरण्ये का वाढवली पाहिजे?

15. अंदाजपत्रक म्हणजे काय ?

16. मारुतीने दुसऱ्या देशाला भेट देण्याचे ठरविले आहे गैरहजेरीत त्याला त्याचे मौल्यवान दागिने सुरक्षित ठेवायचे आहेत तर बँकेकडून त्याला कोणती सेवा दिली जाईल?

**III खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन ते चार वाक्यात मुद्द्यात उत्तरे लिहा** **8x2=16**

17. 19 व्या शतकातील सामाजिक आणि धार्मिक सुधारणांची चळवळ केलेल्या प्रसिद्ध संघटनांची नावे लिहा .

18. भारतीय स्वातंत्र्याच्या पहिल्या युद्धाचे परिणाम काय आहेत?

19. प्रादेशिक समस्या सोडविण्याच्या उपायांची यादी तयार करा .

**किंवा**

दहशतवादावर नियंत्रण ठेवण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या उपायांची यादी करा.

20. भारतातील अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्यासाठीचे कायदेशीर उपाय कोणते आहेत?

**किंवा**

विकासात्मक कार्यक्रमा अंतर्गत ग्रामीण महिलांना कोणत्या कार्यक्रमाद्वारे प्रोत्साहन मिळते ?

21. भारतातील हवामान ऋतूंची महिन्यानुसार नावे लिहा.

22. राष्ट्रीय विद्युत जाळे कसे उपयोगाचे आहे?

23. भारतात हाती घेण्यात आलेल्या आवास कार्यक्रमांची नावे लिहा

24. ग्राहक संरक्षण कायद्याचे मुख्य उद्देश काय आहेत?

**IV खालील प्रश्नांची प्रत्येकी सहा वाक्यात उत्तरे लिहा.** **9x3=27**

25. राजा मार्तंड वर्मा यांनी आपल्या साम्राज्याला बलाढ्य कसे बनविले ? वर्णन करा .

**किंवा**

वेलस्लीने भारतातील राज्यांना आपल्या नियंत्रणाखाली कसे आणले? वर्णन करा .

26. चौथा कृष्णराज वडेयर यांची सफलता काय आहे ?

27. स्वातंत्र्यावेळी भारताची फाळणी ही अनिवार्य होती .ससमर्थन करा

28. संयुक्त राष्ट्र संघटनेची (UNO )ध्येय आणि उद्देश काय आहेत ?

29. बेरोजगाराची समस्या सोडविण्यासाठी सरकार कशाप्रकारे योजना आखत आहे?

30. सीमा आणि भारताच्या शेजारील देशाबद्दल लिहा

31. भारतातील आरण्यांचे रक्षण करणे का गरजेचे आहे ?

**किंवा**

भारतातील पिके प्रदेशानुसार भिन्न आहेत. का?

32. विकेंद्रीकरणाला पाठबळ देणारे उपाय काय आहेत?

**किंवा**

हरित क्रांतीसाठीचे हाती घेण्यात आलेले उपाय काय आहेत?

33 . बँकेची कार्य काय आहेत?

**किंवा**

उद्योजकांची वैशिष्ट्ये काय आहेत ?

**V खालील प्रश्नांची प्रत्येकी आठ ते दहा वाक्यात/ मुद्द्यात उत्तरे लिहा .** **4x4=16**

34. दक्षिण भारतातील फ्रेंच आणि इंग्रज यांच्यातील संघर्षाचे वर्णन करा

35. भारतावर झालेले ब्रिटिश शिक्षण पद्धतीचे परिणाम काय आहेत?

किंवा

ब्रिटिश जमीन महसूल पद्धतीचे भारतावर झालेले परिणाम काय आहेत ?

36. भारतातील महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी हाती घेण्यात आलेले उपाय काय आहेत ?

37. काळी माती ही बाजूकडील माती( लेटरराईट माती ) पेक्षा वेगळी कशी आहे ?

**VI 38 भारताच्या नकाशाचा आराखडा काढा आणि खालील ठिकाणी दाखवा.** **1 +4=5**

a) हट्टी सोन्याची खाण b) भद्रावती

c) कोची d)अल्पकम

**फक्त अंध विद्यार्थ्यांसाठी पर्यायी प्रश्न( प्रश्न संख्या 38 च्या ऐवजी )**

नदी खोऱ्यातील बहुउद्देशीय योजनेचे मुख्य उद्देश काय आहेत?